# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५४–२०१०/ दिनांक :

श्री. शिवाप्पा तिपण्णा नाटीकर ,
मु. पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

**<u>कोरम</u> :–** १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शिवाप्पा तिपण्णा नाटीकर, मु.पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागांतर्गत संख उप विभागाकडे अर्ज देवून प्रोसेसिंग फी रु.५०/– पावती क्रमांक ५३४४४०५ दि. २८.५.२०१० रोजी भरलेले आहेत. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार वितरण मेन्सचा विस्तार असलेने एक महिन्यात चलन न मिळालेमुळे प्रस्तुतची तक्रार मंचाकडे दि. १६.७.२०१० रोजी दाखल केली आहे. यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.२५२ दि. ८.७.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे.

अंतर्गत कक्षाने आदेश क्र.७९४७ दि. १२.७.२०१० नुसार आदेश पारीत करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आलेस ग्राहक भरपाई द्यावी असे आदेश दिले. तक्रार प्रतिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. २८.५.२०१० रोजी प्रोसेसिंग फी भरलेली आहे. त्यांना दि. १४.७.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. त्यांचे ०.१८ कि.मी. चे लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार हजर, प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांचे म्हणण्यानुसार दि. २८.५.२०१० ला पैंसे भरले आहेत, त्यामुळे १ महिन्यात चलन देणे आवश्यक होते ते न दिल्याने दि. २७.६.२०१० ते १४.७.२०१० या ३ महिन्याच्या झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ३००/– भरपाई मिळण्याचा ग्राहक हक्कदार आहे, त्यामुळे तक्रार मंजूर करावी व तसे आदेश व्हावेत. या उलट, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी चलनाची रक्कम दि. ४.८.२०१० ला भरले आहे अशी माहिती मंचासमोर दिली. ते चलन दि. १४.७.२०१० ला दिले आहे. वि.प.ने झालेल्या विलंबाबद्दल लेखी/ तोंडी स्पष्टीकरण मंचासमोर दिले नाही, त्यामुळे वि.प. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयशी ठरली आहे. त्याचा परिणाम वि.प.ची तक्रारदाराचे मागणीनुसार कृती मानके विनियम त्यासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये दिलेल्या तरतुदीप्रमाणे तक्रारदारास प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे ३ आठवड्यांच्या विलंबापोटी रु. ३००/– भरपाई देणेची जबाबदारी आहे व तक्रारदार ती मिळण्यास हक्कदार आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचा कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी तक्रारदार यांस कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने दि. २७.६.२०१० ते १४.७.२०१० या कालावधीतील ३ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु.३००/– ग्राहकास द्यावेत.

३) सदरची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष